**कृपया प्रसिध्दिसाठी** **3 जुलै 2009**

## मुंबईकरांची पुन्हा उपेक्षाच : राम नाईक

**मुंबई, शुक्रवार :** "देशातील एक कोटी वीस लाख दैनंदिन प्रवाश्यांपैकी निम्म्याहून अधिक म्हणजे 65 लाख प्रवासी मुंबईकरांचा आपल्या भाषणात साधा उल्लेखही रेल्वे मंत्री कु. ममता बॅनर्जी यांनी न केल्याने मुंबईकरांची घोर निराशा झाली आहे. मुंबईकरांना सापत्नभावाने वागविण्याचे श्री. लालू प्रसाद यांचे धोरणच त्या पुढे चालविणार असे यामुळे वाटल्याने मुंबईकर संतापले आहेत," अशी प्रतिक्रिया माजी रेल्वे राज्य मंत्री (स्वतंत्र प्रभार) श्री. राम नाईक यांनी दिली आहे.

"एमयुटीपी 1 व 2 साठी किती तरतूद केली आहे याबाबत रेल्वे मंत्र्यांच्या भाषणात एक शब्दही नाही. एवढेच नव्हे तर हार्बर मार्गावर 12 डब्यांच्या गाड्या तसेच जलद गाड्या देण्याचीही घोषणा त्यांनी केली नाही. गेली दोन वर्षे प्रवासी भाड्यात कपात झाली. अन्य प्रवाशांप्रमाणेच मुंबई उपनगरी प्रवासी भाडेही कमी करण्याची मागणी रेल्वे मंत्र्यांनी मान्य केली नाही, याचा करावा तेवढा निषेध कमीच आहे. चेन्नई, कोलकात्यातील महिला प्रवाशांना विशेष गाडी देणा-या रेल्वे मंत्र्यांनी वारंवार मागणी करुनही मुंबईच्या महिला प्रवाश्यांना गर्दीच्या वेळी मध्य व पश्चिम रेल्वे वर आणखी एक-एक गाडी दिली नाही याचा स्वाभाविक संताप मुंबईतील महिलांना आहे," असेही श्री. राम नाईक म्हणाले.

तात्काळ सेवेची भाडे आकारणी ही प्रवासी जेवढे अंतर प्रवास करणार आहेत तेवढयासाठीच केली पाहिजे, अशी मागणीही श्री. नाईक यांनी केली. "रेल्वे अर्थ संकल्पाच्या चर्चेच्या वेळी मुंबईकर प्रवाश्यांच्या मागण्या पूर्ण न झाल्यास आम्ही आंदोलन करु," असा इशाराही श्री. राम नाईक यांनी दिला.

**(कार्यालय सचिव)**